# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.११/०४/२०१९

## दि.१०/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३६/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५४,रा.सोपानबाग सोसा.घोरपडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०४/२०१९ रोजी २०/०० ते २०/२० वा.चे दरम्यान सेक्रेर्ट हार्ट सोसा.वानवडी,पुणेचे बाहेर उपसाऊथ हॉटेलचे शेजारील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मैत्रीणीसह पायी जात असताना,नमुद इसमांनी अंधाराचा फायदा घेवुन,दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन १० हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.डी.आर.मोहिते ८३०८८४४००४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३५/१९,भादविक ३२५,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)(१)१३५, आर्म अॅक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अप्फान इनामदार,वय-२९,रा.गल्ली नं.१५बी,सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी १७/३० वा.फिर्यादीचे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भाऊ व यातील नमुद इसम यांची १६/०० वा. सुमारास रॅली मध्ये एकमेकां मध्ये बघणेवरून वाद झाला होता. त्याच कारणावरून सदर इसमांनी चिडुन जावुन संगनमत करून,फिर्यादी यांचे उजवे हातावर उलटा कोयता मारून,तसेच बांबुने,हाताने व विटाने मारहाण करून,त्यांना जखमी करून,तुझी विकेटेच काढतो अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, बी.डी.कांबळे ८८८८८१३६६४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १९३/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५० वर्षे,रा.गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१९ रोजी सकाळी ११/३० वा.माणिक ज्वेलर्स,३८१,गुरुवार पेठ,फुलवाला चौक, पुणे येथे फिर्यादी यांचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे माणिक ज्वेलर्सचे दुकानात हजर असतांना,यातील नमुद अज्ञात मोबाईल धारकाने त्यांचे दुकानाचे लॅंडलाईनवर फोन करुन,त्यांचेशी संपर्क साधुन,मी राठोड ज्वेलर्स येथुन बोलत असल्याचे भासवुन,फिर्यादी यांना सोन्याचे दागीन्यांची ऑर्डर देवुन, त्यांचा विश्वास संपादन करुन,त्यांचेकडुन पाच सोन्याचे नेकलेसचे दागिने ५,६३,४००/- रू किचे घेवुन,त्याबदल्यात त्यांना खोटे सोन्याचे बिस्कीट देवुन,फिर्यादी यांचा विश्वासघात करुन फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांनी झाले प्रकारबाबत त्यांचे नातेवाईकां बरोबर चर्चा करुन आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमाजी राठोड ८८०५१६२६९१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १५७/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३३,रा.कामठे वस्ती,शिवणे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात दोन इसम व एक महिला (अटक नाही) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२०/१०/२०१७ ते दि.०७/११/२०१७ रोजीचे दरम्यान ओएलक्स वेबसाईटवरुन ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात दोन इसम व एक महिला यांनी ओएलक्स वेबसाईटवर स्वीफ्ट गाडीची विक्रीसाठी जाहिरात देवुन,सदरची गाडी ही लोहगाव विमानतळ कारगो पार्कींग येथे आहे असे भासवुन,सदर गाडी तुम्हाला पाहीजे असल्यास पार्कींग चार्ज एकुण १,८६,०००/- रुपये भरण्यास सांगुन,फिर्यादी यांना गाडी न देता त्यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. खांडेकर ७८८८० ४२९११

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे २८९/१९,भादविक ३८६,३४१,५०६(२),५००,३४

**फिर्यादी** एक पुरूष,वय-२८ वर्षे,रा.शास्त्री रोड,पुणे

**आरोपी** राम भरत जगदाळे,रा.पर्वती पायथा,सहकारनगर,पुणे (अटक) व इतर एक इसम व दोन महिला

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२८/०९/२०१८ रोजी १७/.०० वा.ते २०/०० वा.राम भरत जगदाळे यांचे ऑफीस मध्ये सहकारनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसम व महिला यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचेविरुध्द वानवडी पोलीस ठाणेस दाखल असलेला गुन्हा मिटवण्यासाठी अ.क्र.१ याचे ऑफिस मध्ये बोलावून घेवुन,तेथे फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांना तीन तास अटकावून ठेवुन जबरदस्तीने नमुद महिला हिची माफी मागण्यास लावुन,त्याचे चित्रीकरण करून त्यांचेकडे १५ लाखाची रूपयेची मागणी केली. त्यापैकी १ लाख रुपये त्यांनी स्वाकारून,तद्नंतर उरलेली रक्कम न दिलेने त्यांनी माफी मागितल्याचा व्हीडीओ माध्यमांवर प्रसारीत करून,फिर्यादीं यांची बदनामी करून, मिटींगचे दरम्यान अ.क्र.१ याने त्याचेजवळील पिस्तुलचा धाक फिर्यादीस दाखवुन जीवे मारण्याची त्यांचेवर ॲसीड टाकण्याची तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पोलीस निरीक्षक, गजानन पवार, युनिट-२,गुन्हे शाखा,पुणे शहर ९१५८५२०००२

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सिंहगड पो स्टे ३१४/१९,भादविक ३८०,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-३७ वर्षे,रा.वडगांव-बुद्रुक,पुणे

**आरोपी** दोन अनोळखी इसम व एक महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०४/१९ रोजी दु.१२/०० ते १७/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी वडगांव-बुद्रुक,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद दोन अनोळखी इसम व एक महिला यांनी एका खाजगी कंपनीतुन आल्याचे सांगुन,सदर कंपनीचे स्क्रॅच कार्ड घेण्यास सांगुन,स्क्रॅच कार्डचे पैसे देण्यासाठी फिर्यादी यांनी त्यांचे बेडरुम मधील लोखंडी कपाटातील लॉकर मधुन काढुन,सदर कपाटाचे लॉकर नजरचुकीने उघडे राहीले. त्यावेळी फिर्यादी हे त्यांना सरबत बनविण्यासाठी किचन रुम मध्ये गेले असताना,त्यादरम्यान सदर इसम व महिला यांनी उघडया राहिलेल्या कपाटाचे लॉकर मधील ५,४५,०००/- रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ७,४५,०००/- रू किचा ऐवज लबाडीने चोरुन नेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, साळुखे ७०२०६८४७१०

## दि.११/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** बिबवेवाडी पो स्टे १४५/१९,भादविक ३८०,५११,४२७,३४

**फिर्यादी** गणेश अहिवळे,वय-३५,रा.बिबवेवाडी,पुणे

**आरोपी** दोन अनोळखी इसम वय अंदाजे २० ते २२ वर्षे

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.११/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/५३ वा.पुर्वी सुप्रिम प्लाझा बिल्डींग,काळुबाई मंदिरा समोरील

| | |
|---|---|
| | आयसीआयसीआय बँकेचे एटीएम मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सिक्युरिटी फोर्स पेट्रोलिंग ऑफीसर म्हणुन काम करतात. वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद दोन अनोळखी इसम यांनी एटीएम सेंटर मध्ये प्रवेश करून,एटीएम मशीन मध्ये चोरी करण्याचा प्रयत्न करून,सदर मशीनचा दरवाजा उचकटुन व मशीनचे कि-पॅड लॉक तोडुन मशीनचे सुमारे ३० हजार रूचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.आर.आडके ९७६३३३४४०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**